Page No. 1
Date / /

# श्वान मंदिर

माझे मित्र श्री सुरेश आवचीत यांनी सांगितलेल्या कल्पनेवरून मी ही कथा लिहीली आहे.

साल आठ वर्षांपूर्वी आम्ही दोघे सहल कंपनी मार्फत हैदराबादला विमानाने सहलीला गेलो होतो. आमच्या सोबत साधारणपणे पन्नास लोक होते.

हैदराबादला पोहचताच तेथील व्यवस्था पाहून आनंद वाटला. हॉटेल, जेवण, आराम उत्तम होते. मग प्रसिद्ध ठीकाणे पाहीली. दुसऱ्या दिवशी सालारजंग म्युझियम, रामोजी सिटी, बिर्ला मंदिर, हुसेन गार्डन, लुंबीनी गार्डन, श्री शैलम पाहयाचे.

आज शेवटचा दिवस लाड बझार चार मिनार पाहण्यासाठी निघालो. तेवढ्यात मॅनेजर म्हणाले, आज आपण वेगळ्या ठीकाणी जाणार आहोत. त्याचे नांव आहे 'श्वान मंदिर'!! तेवढ्यात सहलीतील एक मुलगा ओरडला, शी!! कुत्र्याचे मंदिर ?? आपण नाही येणार. मॅनेजर म्हणाले, ज्यांना यायचे आहे त्यांनी नावे द्यावीत, पण आपण येथे आहोत तोवर कोणी कुत्रा असा उल्लेख करू नका.

आम्ही निघालो, वीस पंचवीस मैल गेल्यावर डावीकडे डोंगरावर एक ठीपका दिसू लागला. जसे जसे जवळ जावू लागलो तसा तसा त्या ठीपक्याचा आकार श्वानाचा भासू लागला. चारशे पायऱ्या चढून जाताच वीस फुटाची श्वानाची आकृती दिसू लागली. मॅनेजर म्हणाले, सर्वांनी झाडाखाली बसूया, मी या मंदिराची माहीती सांगतो, त्यानंतर चहा/फराळ घेईलच.

या जागेवर मोठी टेकडी होती. त्या टेकडीवर एक सावकार रहात होता. त्याच्याकडे भरपूर दागिने होते. ते त्याने पिढीजात लपवून ठेवले होते. गरीब लोकांना फसवून तो धंदा करीत असे. असेच एकदा एक गरीब माणूस कर्जाने पैसे मागायला आला तेव्हा सावकार म्हणाला, तारण काय ठेवणार? तो म्हणाला, साहेब हा माझा सख्खा मुलगा ठेवीन. तो आपल्या बंगल्याची राखण करेल. सावकार म्हणाला, पळून गेला तर! त्यावर तो मनुष्य म्हणाला, की; तेव्हा मला ठार मारा!

असे एक वर्ष गेले. एका रात्री चोर

बंगल्यात शिरले. त्यांना माहीत होते की सावकाराने दागिने विहिरीत ठेवले आहेत. म्हणून दोन चोर विहिरीतून दागिने बाहेर आणून ठेवायचे आणि इतर दोन चोरांनी ते बाहेर न्यायचे. असे ठरले. हे श्वानाच्या लक्षात आले.

चोर जसे विहिरीत उतरायचे तसा श्वान पळत येऊन दुसरे दोन चोर यायच्या आत वर ठेवलेले सोने तोंडात घेऊन आतल्या बाजूला ठेवून यायचा. वरील दोन चोरांना वाटायचे की अजून ते यायचेच आहे. असा तीन चार खेपा झाल्यावर वरचे चोर लांब बसले होते ते आले. त्यांनी विचारले, सोने कुठे आहे? खालून आलेल्या चोरांनी विचारले, आम्ही तेच विचारतो आहे, सोने कुठे आहे? म्हणजे मग दागिने कुठे गेले? तेवढ्यात त्यांना तिथे श्वान दिसला, चोरांच्या लक्षात आले की, त्यानेच दागिने पळवले असणार !!

तेवढ्यात गरीब माणूस कर्ज फेडण्यासाठी दागिने घेऊन आला. सावकारही बंगल्याबाहेर आला. त्या सर्वांसमोर चोरांनी श्वानाला गोळी घातली. बिचारा श्वान विहिरीत पडून मेला. यात श्वानाचा काय अपराध होता?

गावाकडील लोकांची माणुसकी मेलेली नव्हती. त्यांनी सावकाराच्या मदतीने हे श्वान मंदिर बांधले. श्री दत्तगुरूंचा आवडता म्हणून दत्त जयंतीला येथे यात्रा भरते !!

ही माहिती ऐकली आणि सगळ्यांनीच— अश्रुपूर्ण नयनांनी त्या श्वानाला दंडवत घातले !!

श्री अरविंद लिमये
मोबा. 9146025754

